# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक

# अंतःशुद्धीचे सोपान

## *उद्धरण २८*

अनुशासनाचा अर्थ आहे केंद्रित होणे, हे पाहणे की मनामध्ये कशाचा उदय होतो आहे आणि काय अस्ताला जाते आहे. अनुशासनाचा अर्थ आहे साक्षी होणे आणि ती शक्ती प्राप्त करणे ज्यायोगे या प्रक्रियेचे अगदी आरंभ-बिंदू, म्हणजेच काम आणि क्रोधांची बीजे, यांना खरोखर समजून घेता येईल. जेव्हा तुम्ही क्रोध आणि अतृप्त इच्छेच्या पाऊलखुणांचा छडा लावू शकता आणि त्यांच्या मागेमागे, त्या जेथेजेथे घेऊन जातील तेथे जाण्यासाठी बांधलेले नसता, तेव्हा तुम्ही अनुशासित व्यक्ती म्हणविले जाता, एक अशी व्यक्ती, जिने स्वतःला समजण्याची शक्ती संपादित केली आहे.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय ५ ‘क्रोधापासून मुक्ती : भाग १,’ यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. ८०.